महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती

ई-मेल:- **gmcamravati@gmail.com**

जा.क्र.शावैमअ/ प्राध्यापक व सह. प्राध्या /मुलाखत/जाहिरात/ ३९९ /२४ दि.१७०८.२०२४

## जाहिरात

## (INTERVIEW)

**विषय** - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे कंत्राटी पद्धतीने भरावयाच्या पदांची जाहिरात प्रकाशित करण्याबाबत...

**संदर्भ**- १. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एमईडी-२०२२/प्र.क्र.२२९/२२/शिक्षण-१, दि.१४.०७.२०२३

२. The Gazette of India, CG-DL-E-१७०८२०२३-२४८१५४ EXTRAORDINARY PART-III SECTION ४ NMC, NEW DELHI, DT: १६/०८/२०२३ (MSR).

३.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय अध्यापन व रुग्णसेवा याकरिता ३६४ दिवसांकरिता वयाच्या ६९ वर्षे वयोगटाचे आतील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक खाजगी व अन्य क्षेत्रातील उमेदवारांना करार पद्धतीने नियुक्ती देण्यासाठी जाहिरात देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्तपदे | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मानधन प्रति महिना | अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | १८ | एनएमसी, नवी दिल्ली यांचे मानकानुसार | १,८५,०००/- | २९/०८/२०२४ |
| २ | सहयोगी प्राध्यापक | २१ | एनएमसी, नवी दिल्ली यांचे मानकानुसार | १,७०,०००/- | |
| | **एकूण** | **३९** | | | |

**१. मुलाखत :-**

१. सोबत प्रकाशित केलेल्या विहित नमुन्यातील अर्ज रितसर भरुन कार्यालयीन पत्ता - मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांचे कार्यालय, राष्ट्रीय आरोग्य अभियान इमारत, जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे अथवा अर्ज gmcamravati@gmail.com ई-मेल द्वारे दि. २९/०८/२०२४ रोजी पर्यंत सादर करावे.

२. मुलाखत मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई यांचेद्वारे ऑनलाइन घेण्यात येईल. मुलाखतीच्या दिनांक व ऑनलाइन लिंक स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

३. मुलाखतीच्या नंतर सर्व मूळ प्रमाणपत्रे (Original Documents) सादर करणे आवश्यक आहे.

**२. महत्वाची टीप :-**

१. उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२. उमेदवाराचे वय नियुक्ती वेळेस कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पद्धतीने नियुक्तीसाठी अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्री आयुर्विज्ञान परिषदेने विहित केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार पा असतील.

**३. नियम व अटी :-**

१. करार पद्धतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील तथापि सदरहू पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करून देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहतील.

२. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास गंभीर स्वरूपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

३. करार पद्धतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकानुसार अध्यापन रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४. वरील प्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

६. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तिक रजा अनुज्ञेय असतील.

७. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे किंवा माहिती आधारसामग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथ पत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारासच करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थी हित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

१०. करार पद्धतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११. अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरिक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२. सदर जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे किंवा सदरची जाहिरात पूर्णतः रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता स्वतःकडे राखून ठेवला आहे.

१३. नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग यांना राहतील.

**१४. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.**

१५. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक वेगळ्याने कळविण्यात येईल.)

१७. मुलाखतीला येताना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मूळ कागदपत्र सोबत आणणे बंधनकारक राहील.

**४. शैक्षणिक पात्रता :-**

१. महाराष्ट्र आयुर्विज्ञान परिषद व भारतीय आयुर्विज्ञान परिषद नवी दिल्ली यांच्या मानकानुसार अर्हता प्राप्त.

२. महाराष्ट्र मेडिकल कौंसिल यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणी (Valid MMC Registration) असणे आवश्यक.

५. टीप :-

**सदर जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पूर्णतः रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.**

(डॉ. अनिल कृ. बत्रा),
एमडी, एलएलबी
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती.

प्रति -

१. कार्यालयीन संकेतस्थळ, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

२. सूचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती.

प्रत माहितीस्तव -

१. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग, मुंबई.

२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

३. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य याना सूचना फलकावर लावण्याकरिता सस्नेह सादर.

| अ.क्र. | विषय | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | | | |
| १ | शरीररचनाशास्त्र | राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या नियमानुसार. | १ |
| २ | शरीरक्रियाशास्त्र | | १ |
| ३ | जीवरसायणशास्त्र | | १ |
| ४ | औषधशास्त्र | | १ |
| ५ | विकृतीशास्त्र | | १ |
| ६ | सुक्ष्मजीवशास्त्र | | १ |
| ७ | न्यायवैद्यकशास्त्र | | १ |
| ८ | जनऔषधवैद्यकशास्त्र | | १ |
| ९ | औषधवैद्यकशास्त्र | | १ |
| १० | शल्यचिकित्साशास्त्र | | १ |
| ११ | कान नाक घास शास्त्र | | १ |
| १२ | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | | १ |
| १३ | बधिरीकरणशास्त्र | | १ |
| १४ | क्ष-किरणशास्त्र | | १ |
| १५ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | | १ |
| १६ | मनोविकृतीशास्त्र | | १ |
| १७ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | | १ |
| १८ | क्षय व उररोगशास्त्र | | १ |
| | | एकूण | १८ |

(डॉ. अनिल कृ. बत्रा),
एमडी, एलएलबी
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती.

| अ.क्र. | विषय | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| सहयोगी प्राध्यापक | | | |
| १ | शरीररचनाशास्त्र | | १ |
| २ | शरीरक्रियाशास्त्र | | १ |
| ३ | जीवरसायणशास्त्र | | १ |
| ४ | औषधशास्त्र | | १ |
| ५ | विकृतीशास्त्र | | २ |
| ६ | सुक्ष्मजीवशास्त्र | | १ |
| ७ | न्यायवैद्यकशास्त्र | | १ |
| ८ | जनऔषधवैद्यकशास्त्र | राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या नियमानुसार. | २ |
| ९ | औषधवैद्यकशास्त्र | | ३ |
| १० | शल्यचिकित्साशास्त्र | | २ |
| ११ | बधिरीकरणशास्त्र | | २ |
| १२ | क्ष-किरणशास्त्र | | १ |
| १३ | बालरोग चिकित्साशास्त्र | | १ |
| १४ | मनोविकृतीशास्त्र | | १ |
| १५ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | | १ |
| | | एकूण | २१ |

(डॉ. अनिल कृ. बत्रा ),
एमडी, एलएलबी
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती.

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती

ई-मेल:- gmcamravati@gmail.com

| कार्यालयीन कामकाजाकरीता | | | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| अर्ज क्रमांक | | अर्ज दिनांक | |
| | | अर्ज प्राप्त दिनांक | |

## विभागीय निवड मंडळ

## प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक अर्जाचा नमुना

प्रति,

मा. अधिष्ठाता,

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,

अमरावती.

फोटो

| | | |
|---|---|---|
| अर्जातील पदाचे नाव - | विभागाचे नाव- | |
| उमेदवाराचे संपुर्ण नाव - | | |
| संपूर्ण पत्ता - | | |
| मोबाईल क्र. | पॅन क्र. | आधार क्र. |
| ई-मेल- | | |

| जन्म दिनांक | दिनांक | महिना | वर्ष | मुलाखतिच्या दिवशीचे वय | वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

जन्म दिनांकाच्या पुराव्यासाठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे

| जात प्रवर्ग | SC | ST | VJ | NT १ | NT २ | NT३ | SBC | OBC | EWS | SEBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योग्य ठिकाणी टिकमार्क करावी | | | | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| अर्जासोबत पॅनकार्डची छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |
| अर्जासोबत आधारकार्डची छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |
| अर्जासोबत रहिवासी प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |
| अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्राची छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |
| अर्जासोबत चालु आर्थिक वर्षाची दिनांक ३१ मार्च पर्यत नॉन क्रिमीलीयर लागु असल्यास प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| अर्जदार इतरत्र नोकरीत आहे काय ? | होय | नाही |
| शासकीय नोकरीत असल्यास तपशील देऊन संबंधीत संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अनुभव असल्यास, अनुभव प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत प्रथम, व्दितीय, तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. अथवा तत्सम पदवी गुणपत्रीकाच्या छायांकीत प्रती जोडावे. | होय | नाही |

| | | |
|---|---|---|
| अर्जासोबत पदव्युत्तर पदवी/पदवीका परिक्षेचे गुणपत्रीकांचे छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |
| अर्जासोबत एम.बी.बी.एस. अथवा तत्सम पदव्यांची प्रयत्नांचे प्रमाणपत्र (Attempt Certificate) जोडावी | होय | नाही |
| आंतरवासीता पुर्णत्व प्रमाणपत्र छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अर्जदार बंधपत्रीत असल्यास तसे प्रमाणपत्र छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अर्जासोबत पदवी,पदव्युत्तर पदवी व पदवीका यांचे एम.एम.सी/ एन.एम.सी/एम.सी.आय/एम.डी.सी/डी.सी.आय चे कायम नोंदणी वैध प्रमाणपत्र व नुतणीकरण प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत पदव्युत्तर पदवी व पदवीका यांचे प्रमाणपत्र छायांकीत प्रत जोडावी | होय | नाही |

| शैक्षणीक अर्हता | उत्तीर्ण केलेली परीक्षा | प्राप्त गुण | पैकी गुण | टक्केवारी | लागलेले प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | पदवीगुण | | | | |
| २ | पदव्युत्तर पदवी गुण | | | | |
| ३ | पदवीका गुण | | | | |

| | | |
|---|---|---|
| अनुभव प्रमाणपत्र | होय | नाही |
| अर्जदार शासकीय संस्थेत कार्यरत असल्यास विषयांकित प्राध्यापक व विभाग प्रमुखांची शेरा | | |

महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ मधील नमुना-अ (नियम ४ पहा)

मी,
श्री/श्रीमती/कुमारी/डॉ..____________________श्री.__________________________________
_
यांचा मुलगा/मुलगी/पत्नी वय____ वर्ष, राहणार पुढे पुढील प्रमाणे असे जाहीर करते/करतो की,मी-_______________ या पदासाठी अर्ज सादर करीत आहे. आज मला (संख्या)____ इतके मुले हयात आहेत. त्यापैकी दि.२८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या_____ इतकी आहे. हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अपात्र ठरविण्यात येईल याची मला जाणीव आहे.

वर नमुद केलेली माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यायर रदद करण्यात येईल आणि माझ्या विरुध्द कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची स्वाक्षरीदिनांक -

सोबत अर्जाचे शुल्क रुपये २५०/- ची शासकीय पावती क्रमांक ____________दिनांक / /२०२४

टिप :-

१. अर्जदाराने अर्जा मधील सर्व माहिती अचुक भरणे अनिवार्य आहे. अर्थात माहिती अपूर्ण असल्यास सदरील अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.
२. अर्जदाराने अर्जासोबत छायांकित (SELF ATTESTED) सत्यप्रती जोडलेल्या असाव्यात.
३. अर्जदाराने प्रत्येक पदासाठी/विषयासाठी स्वतंत्र अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित सहसादर करावा.
४. अर्जदाराने अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर विहीत जागेवर लावणे अनिवार्य आहे.
५. अर्जदाराने संस्थेत कार्यरत असल्यास आपला अर्जसंबधित विभागप्रमुख यांचे मार्फत जमा करणे कार्यालयीन वेळेत अनिवार्य आहे.

| तपासणी समितीची स्वाक्षरी | | | |
|---|---|---|---|
| | अधक्ष | सदस्य (विषयतज्ञ) | सदस्य |